महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल. बी. एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ६९ /२०२४ दि. ०३/०४/२०२४

## वाहतूक नियंत्रण अधिसूचना

**ज्याअर्थी, उल्हासनगर** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. १०/०४/२०२४ रोजी **'सिंधी बांधवांचा चेटीचंड उत्सव'** साजरा **करण्यात** येणार आहे. त्यानिमित्त मिरवणूक काढण्यात येणार असून सदर मिरवणूकीत मोठया प्रमाणात सिंधी बांधव सामील होत **असतात.** सदर मिरवणुकीच्या दरम्यान मिरवणूक मार्गावर वाहतूक कोंडी टाळण्यासाठी तसेच वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होण्याकरीता आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद, नो पार्कीगं** — **१)** झुलेलाल मंदीर चौक – साधुबेला चौक – भारतचौक – शिरू चौक – नेहरू चौक – लिंक रोड – न्यु इरा चौक – शिवाजी चौक – शास्त्री चौक – हिराघाट – पवई चौक या मिरवणूक मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना चेटीचंड महायात्रा मिरवणुक पवई चौक पर्यत दि. १०/०४/२०२४ सकाळी **११:०० ते रात्रौ १८:०० वाजेपावेतो नो पार्किंग करण्यात येत आहे.**

**प्रवेश बंद** — २) झुलेलाल मंदीर चौक – साधुबेला चौक – भारत चौक – शिरू चौक – नेहरू चौक – लिंक रोड – न्यु इरा चौक – शिवाजी चौक – शास्त्री चौक, हिराघाट, पवईचौक या **मिरवणूक मार्गावरील वाहतूक तसेच रहदारी ही चेटीचंड महायात्रा मिरवणुक पुढील चौकात जाई पर्यत सदर वाहतूक तात्पुरत्या स्वरूपात आवश्यक त्या पर्यायी मार्गाने वळण्यात येईल.**

**पर्यायी मार्ग** — **अ) झुलेलाल मंदीर चौक** – झुलेलाल मंदीर मार्ग भारत चौक गोल मैदान तसेच बिर्लागेट व इतर ठिकाणी जाणारी वाहतुक ही झुलेलाल चौक येथुन खेमानी मार्ग इच्छित स्थळी जातील.

**पर्यायी मार्ग** — **ब) उल्हासनगर वाहतुक उपशाखा कार्यालय समोरील चौक** – येथून भारत चौक मार्ग खेमानी–धोबीघाट –तसेच झुलेलाल चौक मार्गे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहने उल्हासनगर वाहतुक उपशाखा कार्यालय येथुन ओटी नं. १ मार्ग बाबा बसंतराम दरबार – मच्छी मार्केट येथुन इच्छित स्थळी जातील.

**क) भारत चौक** – भारत चौक मार्गे गोल मैदान नेहरू चौक बाजुकडे जाणारी वाहतुक ही मच्छीमार्केट मार्ग तसेच बाबा बेफिक्री चौक मार्ग इच्छित स्थळी जातील.

**ड) नेहरू चौक** – नेहरू चौक मार्गे शिरू चौक तसेच खेमानी कडे जाणारी वाहतुक ही मच्छी मार्केट व भारत चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**इ) शिवाजी चौक** – शिवाजी चौकात – अंबरनाथ शहराकडुन बाजुकडुन कल्याण बाजुकडे जाणारी वाहतुक ही फॉलवर लाईन येथुन जवाहर हॉटेल–नेहरू चौक– गोल मैदान– मधुबन चौक– गुरूव्दारा चौक–शांतीनगर मार्गे इच्छित स्थळी जातील.

**ई) शास्त्री चौक** – शास्त्री चौक येथून हिराघाटकडे जाणारी वाहतूक स्मशानभूमी चौक येथून काजल पेट्रोल पंप मार्गे इच्छित स्थळी जातील.

. सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना दि. १०/०४/२०२४ रोजी सकाळी ११.०० ते २२.०० वाजेपावेतो अंमलात राहील. सदर अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका तसेच इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

CS CamScanner

**<u>प्रत माहितीसाठी सादर</u>**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

मा. जिल्हाधिकारी, ठाणे.

मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका.

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :–**

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी

पोलीस उपायुक्त, परिमंडळ–४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

**<u>प्रत</u> :–** <u>पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर</u>

२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**<u>प्रत</u> :–** <u>समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे</u>

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**<u>प्रत</u> :–** <u>सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग/प्रभारी अधिकारी, उल्हासनगर, विठठलवाडी, अंबरनाथ वाहतूक शाखा.</u>

CamScanner